पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०५३ दि.२१/०९/२०१९**

## ज्येष्ठ नागरिक कक्ष,पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## ज्येष्ठ नागरिक केंद्रीय समिती बैठक

दि.२१/९/२०१९ रोजी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, येथील कॉन्फरन्स हॉल येथे ज्येष्ठ नागरिक केंद्रीय समिती बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.सदर बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिक यांची सुरक्षितता व त्यांच्या अडीअडचणी सोडविणेकरीता सर्व पोलीस स्टेशन कडील नेमण्यात आलेले नोडल अधिकारी व कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष व प्रतिनीधी तसेच आरोग्य विभाग महानगरपालीका कार्यालय पुणे, समाजकल्याण कार्यालय, पुणे, हेल्प एज इंडीया,पुणे, इ.कार्यालयाकडील अधिकारी यांना बोलावण्यात आले होते. सदर बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिक यांना फुटपाथ वरील पथारीवाले, भाजीवाले, टपरीवाले यांचेमुळे फुटपाथ वरुन चालताना येणा-या अडचणी मांडण्यात आल्या, त्या संदर्भाने संबंधीत पोलीस स्टेशन व अतिक्रमण विभाग यांचेशी संपर्क साधुन अडचणींचे निरसन करण्यात येईल असे मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, यांनी सांगीतले, महानगरपालीका आरोग्य विभाग प्रमुख यांनी वैदयकीय सोयीसुवीधा बाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच हेल्प एज इंडीया या संस्थेकडुन गरजु ज्येष्ठांना आरोग्यविषयक सुविधा फिरत्या दवाखान्याव्दारे मोफत पुरविल्या जातील असे सांगण्यात आले.

सदरवेळी श्री रवींद्र शिसवे, सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर, डॉ. शिवाजी पवार, सहा.पोलीस आयुक्त, अभियोग गुन्हे शाखा,पुणे शहर, श्रीमती. वैशाली चांदगुडे, पोलीस निरीक्षक,ज्येष्ठ नागरिक कक्ष,पुणे शहर तसेच सर्व पोलीस स्टेशन कडील ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता व अडीअडचणी सोडविणेकरीता नेमण्यात आलेले नोडल अधिकारी व कर्मचारी, पोलीस स्टेशनकडील ज्येठ नागरिक संघाचे अध्यक्ष तसेच श्री.राजीव कुलकर्णी, हेल्प एज इंडीया,पुणे, श्री. विशाल अ.लोंढे,विशेष अधिकारी, समाजकल्याण कार्यालय, पुणे श्री. जी. के. आल्हाट, समाजकल्याण कार्यालय, पुणे, डॉ.रामचंद्र हंकारे आरोग्य प्रमुख महानगरपालीका, पुणे, डॉ. मिलींद खेडकर,वैदयकीय अधिकारी आरोग्य विभाग महानगरपालीका, पुणे, ॲड. संतोष बारी, इ. कार्यालयाकडील अधिकारी असे एकुण ८२ सदस्य उपस्थित होते. मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी यापुर्वी झालेल्या बैठकीतील इतिवृत्तांता मधील ज्येष्ठांनी मांडलेल्या अडचणींबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला योग्यती कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या व योग्य ते मार्गदर्शन करण्यात केले.

दि.२१/९/२०१९ रोजी जागतीक अल्झायमर दिवस असल्याने ज्येष्ठ नागरिक व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सदर आजाराबाबत घ्यावयाच्या काळजी याविषयी डॉ.प्रसाद सोनीस, संचालक, स्पंदन केअर सेंटर, सिंहगड रोड पुणे यांनी मार्गदर्शन केले.

सदरचे बैठकीचे वेळी पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथील ज्येष्ठ नागरिक कक्षाकडील कामकाज करणारे पोलीस निरीक्षक, वैशाली चांदगुडे व पोलीस कर्मचारी मपोहवा.जाधव, मपोहवा.गायकवाड, मपोहवा.स्वामी, पोहवा. चाबुकस्वार, मपोना.बारसकर, पोना.सोनवलकर, व मपोशि गलांडे असे उपस्थित होते. सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना ज्येष्ठ नागरिकांचे संदर्भात अधिक कल्पकतेने व व्यापकतेने काम करणेकरीता मा.सह पोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त गुन्हे, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांनी योग्य ते मार्गदर्शन केले आहे.

ज्येष्ठ नागरिक कक्षाकडे सन २०१७ ते २०/९/२०१९ पर्यंत प्राप्त तक्रारी अर्ज व हेल्पलाईन वरील तक्रारींबाबतची माहिती खालीलप्रमाण् आहे.

| अ क्र. | सन | ज्येष्ठ नागरिक कक्षामधील तक्रारी अर्जांबाबत | | सन | ज्येष्ठ नागरिक कक्षामधील हेल्पलाईनच्या तक्रारी बाबत | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | निर्गती | | प्राप्त | निर्गती |
| १ | २०१७ | ३३१ | ३३१ | २०१७ | २७७५ | २७७५ |
| २ | २०१८ | ४६७ | ४६७ | २०१८ | २५८२ | २५८२ |
| ३. | २०/९/२०१९ पर्यंत | ४६० | ४१२ | २०/९/२०१९ पर्यंत | २३६५ | २३६५ |

(वैशाली चांदगुडे)
पोलीस निरिक्षक
ज्येष्ठ नागरिक कक्ष
पुणे शहर